मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी चिंचवड पोलिसांच्या ताफ्यात नवीन वाहने

## उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या हस्ते लोकार्पण : 57 वाहनांना फ्लॅग दाखवुन सदरची वाहने ताफ्यात समाविष्ट केले.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय तसेच शहरातील नागरिकांच्या दृष्टीने आज अत्यंत महत्वाचा दिवस होता. राज्याचे उपमुख्यमंत्री व पुणे जिल्हाचे पालकमंत्री अजित पवार यांनी ४९ बोलेरो निओं, ०६ स्कॉर्पिओ, ०२ महिंद्रा एक्सयुव्ही ७०० असे एकूण ५७ वाहनांना फ्लॅग दाखवुन सदरची वाहने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील वाहन ताफ्यात समाविष्ट केले. तसेच यावेळी अजित पवार यांच्या हस्ते पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयात पासपोर्ट पडताळणीकरिता काम करणारे अमंलदार यांना टॅबचे वाटप करणेत आले.



पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयात नव्याने दाखल होणारे अधिकारी व अमंलदार यांना कायद्यातील तरतुदी, शासनाने तसेच पोलीस महासंचालक कार्यालयाने वेळोवेळी निर्गमित केलेले परिपत्रके, स्थायी आदेश तसेच मार्गदर्शक सुचनांचे अधीन राहुन काम करता यावे या उद्देशाने पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी तयार केलेल्या कार्यपुस्तिकेचे अनावरण अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील संगणक शाखेत महिला पोलीस कॉन्स्टेबल वर्षा राऊत यांनी ई ऑफीसचे कामकाज यशस्वीरित्या पूर्ण करण्यात मोलाचा वाटा उचल्याबद्दल त्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविणेत आले.


या कार्यक्रमास खासदार श्रीरंग बारणे, आमदार अश्विनी जगताप, अण्णा बनसोडे, उमा खापरे, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, महापालिका आयुक्त शेखर सिंह, पोलीस सह आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, संदिप डोईफोडे (गुन्हे) पोलीस उप-आयुक्त, स्वप्ना गोरे पोलीस उप-आयुक्त, (परि१), डॉ. शिवाजी पवार पोलीस उप- आयुक्त, (परि ३), माधुरी कांगणे (मुख्यालय) पोलीस उप-आयुक्त, डॉ. विशाल हिरे (गुन्हे) सहायक पोलीस आयुक्त, इतर पोलीस अधिकारी व अमंलदार नागरिकांच्या उपस्थितीत सदरचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

### या योजनांबाबत चर्चा करण्यात आली..

- » बावधन, संत तुकाराम नगर, काळेवाडी, दापोडी हे नव्याने होणारे चार पोलीस स्टेशन.
- » चिखली पोलीस स्टेशन हद्दीतील मोशी येथील ०९ एकर जागेवर नव्याने उभारण्यात येणारे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाची अतिशय भव्य, अद्ययावत व सर्व सुविधांनी सुसज्य अशा नवीन इमारतीचा आराखडा.
- » वाकड येथील १५ एकर जागेवर पोलीस अधिकारी व अमंलदार यांचे निवासस्थाने बांधणे संदर्भात.
- » वाढते सायबर गुन्हांचे अनुषंगाने मंजूर झालेले आयुक्तालयातील सायबर पोलीस ठाणे संदर्भात.
- » पिंपरी पोलीस स्टेशन, आळंदी पोलीस स्टेशन इमारत, २०० क्वार्टर्स.
- » १६ हजार स्केअर फीट क्षेत्रवर कंपन्याचे सीएसआर फंडातून नव्याने अद्ययावत उभारणेत येणारे म्हाळुंगे एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन आदीबाबत विस्तृत चर्चा करण्यात आली.

# स्व.रतन टाटा यांना श्रद्धांजली

## श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी सायन्स पार्कमध्ये शुक्रवारी सभा



**पिंपरी | प्रतिनिधी**

भारताच्या उद्योग जगताचे पितामह पद्मविभूषण रतन टाटा यांचे बुधवारी रात्री निधन झाले. त्यामुळे देशभरातील उद्योग क्षेत्रावर शोककळा पसरली आहे. पुणे, पिंपरी चिंचवड शहर व रतन टाटा यांचे भावनिक स्नेह संबंध होते. रतन टाटा यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी पिंपरी चिंचवड सायन्स पार्क येथे पिंपरी चिंचवड सायन्स पार्क, मरकळ इंडस्ट्रीज असोसिएशन व धानोरे येथील इंद्रायणी इंडस्ट्रियल तसेच सायन्स पार्कशी सहयोगी विविध संस्थांच्या वतीने शुक्रवारी, (दि. ११) सायंकाळी ५:३० वाजता तारांगण सभागृहात श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी पिंपरी चिंचवड शहर व परिसरातील उद्योजक, कामगार तसेच विविध सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन सायन्स पार्कचे संस्थापक संचालक प्रवीण तुपे यांनी केले आहे.

# मंत्री,आमदारांची मर्जी सांभाळण्यासाठी आयुक्तांनी निविदा प्रक्रियेच्या अटी शर्ती बदलल्या

## महाविकास आघाडीच्या वतीने गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये निविदा प्रक्रिया राबवताना केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांचा भंग करून ठराविक ठेकेदारांना फायदा मिळवून दिला जात आहे. या ठेकेदार कंपन्या राजकीय पदाधिकाऱ्यांशी संबंधित असून, यांच्या दबावाखालीच आयुक्त शेखर सिंह या निविदा प्रक्रियेला मंजुरी देत आहेत. रुग्णालय, शाळा तसेच प्रशासकीय इमारतींसाठी लागणारे सुरक्षा रक्षक आणि ट्राफिक वॉर्डन यासाठी लागणाऱ्या मनुष्यबळ पुरविण्याच्या निविदा अत्यंत चुकीच्या पद्धतीने काढलेल्या आहेत. यातून मोजक्या ठेकेदारांचा फायदा होणार आहे. त्यामुळे अशा निविदा रद्दबातल करून जाचक अटी शर्ती कमी कराव्यात अशी मागणी महाविकास आघाडीच्या वतीने गुरुवारी (दि.10) केली. दरम्यान यावेळी महाविकास आघाडीच्या वतीने मंत्री, स्थानिक आमदार तसेच महापालिकेचे अधिकारी आणि ठेकेदारांवर देखील गंभीर आरोप करण्यात आले आहेत.



याबाबत माविकास आघाडीच्या शिष्टमंडळाने आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन दिले. यावेळी शिवसेना उबाठा गटाच्या पुणे जिल्हा संघटिका सुलभा उबाळे, माजी स्थायी समिती अध्यक्ष अजित गव्हाणे, माजी नगरसेवक विनायक रणसुभे, धनंजय भालेकर, रवी लांडगे, भोसरी विधानसभा प्रचार प्रमुख धनंजय आल्हाट, युवती सेना प्रमुख प्रतिक्षा घुले, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे, मारुती भापकर आदी उपस्थित होते.

यावेळी दिलेल्या निवेदनात महाविकास आघाडीच्या वतीने म्हंटले आहे कि, रुग्णालय, शाळा तसेच प्रशासकीय इमारतींसाठी लागणारे सुरक्षा रक्षक आणि ट्राफिक वॉर्डन यासाठी लागणाऱ्या मनुष्यबळ पुरविण्याच्या निविदा अत्यंत चुकीच्या पद्धतीने काढलेल्या आहेत. याच कामांच्या गत निविदांपेक्षा यावेळी काढलेल्या निविदांमध्ये नियम व अटी शर्ती जाचक असून प्रचंड प्रमाणात बदललेल्या आहेत. ज्यामुळे छोटे-मोठे ठेकेदार यामध्ये सहभागी न होता ठराविक आणि डोळ्यासमोर ठेवलेले या संपूर्ण राज्यातील दोन ते तीन ठेकेदारच समावेश घेऊ शकतात. विशेषता: भाजपचे आमदार प्रसाद लाड, मंत्री हसन मुश्रीफ यांच्याशी संबंधित कंपनी क्रिस्टल, ब्रिक्स तसेच भोसरीचे आमदार महेश लांडगे यांच्या दबावाखाली सैनिक, मे. स्मार्ट प्रायव्हेट लिमिटेड, बीव्हीजी, सिंग इंटेलिजन्स तसेच सुरक्षा विभागाचे प्रमुख उपायुक्त उदय जरांडे यांच्याशी संबंधित असणारी कंपनी नॅशनल अशा कंपन्यांना काम मिळावे अशा प्रकारे या नियम आणि अटी शर्ती तयार केलेल्या दिसून येतात त्यामुळे ही अत्यंत गंभीर बाब आहे. विधानसभेची निवडणूक डोळ्यासमोर ठेवून भाजपला निधी मिळवून देण्यासाठी या सर्व निविदा काढल्या आहेत का? असा प्रश्नही महाविकास आघाडीने उपस्थित केला आहे.

या संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द कराव्यात. अन्यथा महाविकास आघाडीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल. प्रसंगी न्यायालयाचे दरवाजे सुद्धा ठोठावण्यात येतील असा इशारा महाविकास आघाडीने दिला आहे.

यावेळी सुलभा उबाळे म्हणाल्या, पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये निविदा प्रक्रियेचा अक्षरशः खेळखंडोबा सुरू आहे. मंत्री, आमदार यांच्या मर्जीतले ठेकेदार पोसण्याचा उद्योग सुरू आहे. याबाबत अनेक तक्रारी आमच्याकडे येत आहेत. हे प्रकार थांबवण्यासाठी आज आयुक्तांची भेट घेतली.

# रावण दहन कार्यक्रमासाठी आयोजकांनी खबरदारी घ्यावी

## नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अग्निशमन विभागाकडून आयोजकांसाठी नियमावली जाहीर

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरामध्ये दरवर्षी दसरा (रावण दहन) उत्सव उत्साहाने साजरा करण्यात येतो. यानिमित्ताने कार्यक्रमाच्या ठिकाणी नागरीकांची व भाविक भक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते. सदर कार्यक्रमासाठी विविध ठिकाणी मंडप/पेंडॉल उभारण्यात येतात. सदर उत्सवाची सांगता सार्वजनिक ठिकाणी लहान-मोठ्या उंचीच्या रावण मुर्ती उभारुन त्यांचे दहन करण्यात येते. अशा सर्व ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टिने उत्सावाच्या आयोजकांनी नागरिक व भाविक भक्तांच्या सुरक्षेसाठी महत्वाच्या उपाययोजना कराव्यात. यासाठी अग्निशमन विभागाकडून नागरिकांनी अनुसरावयाच्या उपाययोजनांबाबत नियमावली जाहीर केली आहे. सदर नियमावलीचे शहरातील सर्व आयोजक नागरिकांनी पालन करावे. असे आवाहनसुध्दा करण्यात आले आहे.

**अशी आहे नियमावली..**

१. नवरात्री/दसरा कार्यक्रम आयोजकांकडून "रावण दहन" कार्यक्रमाकरीता "रावण मुर्तीची" उभारणी "ज्वलनशिल प्रकारची भट्टी", "इलेक्ट्रिक सब स्टेशन", "पेट्रोल/डिझेल पंप", "सिएनजी स्टेशन", "एलपीजी गॅस गोडाऊन", "हाय टेंशन लाईनच्या खाली", "रेल्वे लाईनच्या लगत बाजुस" करण्यात येऊ नये.

२. रावण दहन कार्यक्रमाकरीता सदर ठिकाणी उपस्थित असणारी लोकसंख्या लक्षात घेवून आवश्यक रुंदीचे/संख्येचे निकास मार्ग उपलब्ध/खुले ठेवणेत यावे, जेणेकरुन आपत्कालीन परिस्थितीत लोकांना सहज बाहेर पडता येईल.

३. दसरा (रावण दहन) कार्यक्रमाचे ठिकाणी अग्नि दुर्घटना घडलेस, अग्निशमन वाहनांना आपत्कालीन परिस्थितीत दुर्घटना स्थळी त्वरीत पोहचणेकामी अडथळा निर्माण होईल असे कोणतेही मंडप रस्त्यावर उभे करुन नयेत. तसेच दुर्घटनासमयी अग्निशमन वाहने, उभारलेल्या मंडपापर्यंत/रावण मुर्तीजवळ पोहोचू शकतील यासाठी रस्ता किमान ६ मीटर रुंदीचा कायमस्वरुपी खुला/उपलब्ध ठेवावेत.

४. रावण दहन कार्यक्रमानिमित्त मंडपात केलेली कोणत्याही प्रकारची विद्युत रोषणाई, बल्ब, ट्यूबलाईट आदींचा संपर्क मंडपातील सजावटीच्या ज्वलनशिल साहित्यास होवू नये अशा पद्धतीने लावणेत यावे. तसेच अधिक उष्णता निर्माण करणारे हॅलोजन बल्ब/ फोकसचा वापर टाळून त्या ठिकाणी LED दिव्यांचा उपयोग करावा.

५. दसरा (रावण दहन) उत्सवाचे ठिकाणी आगीच्या दुर्घटना टाळण्यासाठी व्यवस्थापनाकडून उत्सवाच्या संपुर्ण कालावधीत अग्निशमन यंत्रांचा वापर करता येणारे जाणकार तथा प्रशिक्षित कर्मचारी चोवीस तास तैनात ठेवणेत यावेत.

६. दसरा (रावण दहन) निमित्त सदर ठिकाणी येणाऱ्या भाविक/नागरीकांना माहिती देण्यासाठी, नागरीकांच्या गर्दीवर नियंत्रण ठेवणेसाठी आयोजन समितीमार्फत समन्वयकांची नियुक्ती करणेत यावी.

७. दसरा (रावण दहन) कार्यक्रमाचे ठिकाणी अग्निसुरक्षिततेच्या दृष्टिने ड्रम/टब/बकेट इ. मध्ये पाणी भरुन ठेवणेची व्यवस्था करणेत यावी.

८. आयोजकांद्वारे प्रत्येकी १०० चौ.मी. परिसराचा विचार करता, दसरा (रावण दहन) कार्यक्रमाच्या संपूर्ण कालावधीत त्यांच्या मंडपात "एबीसी टाईप ६ कि.ग्रॅम क्षमतेचे २ नग, सीओटू ४.५ कि.ग्रॅम क्षमतेचे २ नग" अग्निशमन यंत्रणा तसेच मंडपाच्या आवारात पाण्याने भरलेला ड्रम व वाळूने भरलेल्या २ बादल्या उपलब्ध करुन द्याव्यात.

९. रावण दहन कार्यक्रमाकरीता उभारण्यात आलेल्या रावणाच्या मुर्तीची एकत्रीत उंची लक्षात घेवून, सुरक्षिततेच्या दृष्टिने मुर्तीच्या बाजुने उभारण्यात येणारे बेरीकेटींगचे अंतर मुर्तीच्या उंचीच्या अंतरापेक्षा किमान १०० मिटर अधिक असणे आवश्यक आहे. तसेच सदर परिसर मनुष्य विरहित परिसर म्हणून घोषित करणेत यावे.



### आपत्कालीन परिस्थितीमध्ये इथे साधावा संपर्क..

» कार्यक्रमस्थळी कोणत्याही प्रकारे अग्नि दुर्घटना घडल्यास अग्निशमन विभागाचा टोल फ्री नं. १०१ किंवा अग्निशमन नियंत्रण कक्ष मोबाईल क्र. ७०३०९०८९९१, ८४८४०८११०१, ८४८४०८२१०१ या क्रमांकावर त्वरित संपर्क साधावा व त्याचबरोबर, अग्निशमन पथकाने दिलेल्या सूचनांचे नवरात्री उत्सव/दसरा (रावण दहन) आयोजकांनी काटेकोर पालन करावे. असे आवाहन करण्यात आले आहे.

> शहरात विविध उत्सव उत्साहाने साजरे करण्यात येतात. नागरिकांना सर्व उत्सव साजरे करण्यासाठी सुरक्षित वातावरण मिळणे गरजेचे आहे. यासाठी महापालिकेने उत्सव आयोजकांना विविध बाबींची खबरदारी घेण्याबाबत नियमावली जाहीर केली आहे. नागरिकांच्या सेवेसाठी व सुरक्षिततेसाठी महापालिका सदैव तत्पर आहेच. परंतू आयोजकांनी जाहीर केलेल्या नियमावलींचे तंतोतंत पालन करून सहकार्य करावे.
>
> - शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी – चिंचवड महानगरपालिका .

> पिंपरी – चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये विविध उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आयोजकांना देण्यात आलेल्या नियमावलीमधील सर्व घटकांची पूर्तता करावी. नागरिकांच्या हितासाठी महापालिकेने आयोजकांना नियमावली दिली असून उत्सव काळात नागरिकांना सुरक्षित वातावरण देण्यासाठी महापालिकेच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन सहकार्य करावे.
>
> - प्रदीप जांभळे – पाटील, अतिरिक्त आयुक्त , पिंपरी - चिंचवड महानगरपालिका.

> नवरात्र उत्सव/दसरा (रावण दहन) उत्सव कालावधीमध्ये नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सदर सूचना केवळ अग्निसुरक्षेच्यादृष्टीने प्रशासनाकडून देण्यात येत आहेत. नवरात्र उत्सव/दसरा (रावण दहन) आयोजकांनी अग्निशमन विभागाव्यतिरिक्त पोलीस विभाग, वाहतूक विभाग, महापालिकेच्या इतर विभागांची आवश्यक ती परवानगी घेऊन सुचनांचे काटेकोर पालन करुन त्याची अंमलबजावणी करावी.
>
> - मनोज लोणकर, उपायुक्त, अग्निशामक विभाग, पिंपरी – चिंचवड महानगरपालिका.

# डी. वाय. पाटील स्कूल शाळेमध्ये अन्न पदार्थातून विद्यार्थ्यांना विषबाधा

## विद्यार्थ्यांना ब्रेड आणि चटणी खायला देण्यात आली होती.

**पिंपरी | प्रतिनिधी**

शाहूनगर येथील डी. वाय. पाटील स्कूल शाळेमध्ये अन्न पदार्थातून विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याची घटना शुक्रवारी (ता. ११) घडली. विद्यार्थ्यांना ब्रेड आणि चटणी खायला देण्यात आली होती. विद्यार्थ्यांना अचानक पोटदुखी आणि उलटीचा त्रास होऊ लागल्याने या शाळेतील २६ विद्यार्थ्यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, सध्या विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती शाळा प्रशासनाकडून देण्यात आली.

डी. वाय. पाटील स्कूलमध्ये नवरात्रीनिमित्त फुड फेस्टिवलचे आयोजन केले होते. इयत्ता पाचवी आणि नववीतील विद्यार्थ्यांना ब्रेड आणि चटणी खायला देण्यात आली होती. सकाळी नऊ वाजता ब्रेड आणि चटणी खाल्ल्यानंतर २० व २६ विद्यार्थ्यांना उलट्या सुरु झाल्या. काहींच्या पोटात दुखू लागले.

विषबाधा झाल्यानंतर विद्यार्थ्यांना उलटी, मळमळ सारखं वाटून भोवळ येऊ लागल आहे. एकावेळी येवढ्या विद्यार्थ्यांना त्रास होऊ लागल्यामुळे शाळा प्रशासनाने खासगी रुग्णालयात संपर्क साधला आणि रुग्णवाहिका बोलावून घेतली. एकूण २६ विद्यार्थ्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले.




शाळा प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या पालकांना सकाळी माहिती दिली. माहिती मिळताच, विद्यार्थ्यांच्या पालकांनी रुग्णालयात धाव घेतली. विद्यार्थ्यांची अवस्था पाहुनही पालकही बेभान झाले होते, याच निकृष्ट दर्जाच्या सँडविच मधून विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याचा आरोप पालकांनी केला आहे.

दरम्यान, डॉक्टरांनी त्या विद्यार्थ्यांना तपासले असता, त्यांना सँडविच मधून विषबाधा झाल्याचे उघडकीस आले. याप्रकरणी रुग्णालय प्रशासनाने शाळेकडे चौकशी केली. हे सर्व विद्यार्थी १० ते १४ वयोगटातील असून या सर्वांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली.

> 'शाळेत आज फुडफेस्टिवलमध्ये सकाळी विद्यार्थ्यांना ब्रेड आणि चटणी खायला देण्यात आली होती. याच ब्रेड आणि चटणीतून विद्यार्थ्यांना विषबाधा झाली आहे. या विद्यार्थ्यांचा वैद्यकिय खर्च संस्था प्रशासन करणार आहे. विषबाधा झाल्यामुळे डी वाय पाटील स्कूलच्या प्रशासनाने दिलगिरी व्यक्त करत आहे. विद्यार्थ्यांना निकृष्ट अन्न खाऊ घालणाऱ्या दोषींवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल.'.
>
> - अभय कोतकर, अध्यक्ष डी. वाय. पाटील स्कूल शाहूनगर .

# पुण्यात आज 7 नवीन पोलीस ठाण्यांचे उद्घाटन

## नवीन सात पोलिस ठाण्यांमुळे शहरातील पोलिस ठाणी 39 होणार आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहर पोलिस आयुक्तालयाअंतर्गत मंजूर झालेल्या नवीन सात पोलिस ठाण्यांच्या कामकाजाला शुक्रवारपासून सुरूवात होणार आहे. गृहविभागाने गुरुवारी रात्री याबाबतचे आदेश काढले आहेत. शिवाजीनगर येथील पोलिस मुख्यलायात आयोजित कार्यक्रमात गृहमंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार याच्या उपस्थितीत या पोलिस ठाण्यांचे दुपारी दोन वाजता उद्घाटन होणार आहे.

शहराचा वाढता विस्तार, लोकसंख्या, वाढती गुन्हेगारी, नागरिकांची सुरक्षितता, बंदोबस्त, महत्वाच्या व्यक्तींचे दौरे आदी बाबींमुळे पोलिस यंत्रणेवरील ताण वाढत होता. तसेच काही पोलिस ठाण्यांची हद्द मोठी असल्यामुळे कामकाजात निर्माण होणाऱ्या अडचणींचा विचार करून या नवीन सात पोलिस ठाण्यांची निर्मिती करण्यात आली आहे.

शुक्रवार पासून ही पोलिस ठाणी सुरू होणार आहेत. त्यासाठी 816 मनुष्यबळ देखील मंजूर झाले आहे. तसेच, पायाभूत सोई- सुविधांसाठी 59 कोटी 59 लाख रुपयांचा निधी मंजूर झालेला आहे. दरम्यान, नवीन सात पोलिस ठाण्यांमुळे शहरातील पोलिस ठाणी 39 होणार आहेत. आंबेगाव, नांदेड सिटी, बाणेर, खराडी, वाघोली, काळेपडळ आणि फुरसुंगी अशी नवीन पोलीस ठाण्याची नावे आहेत.

# इंद्रायणी नदीच्या पूररेषेतील बंगले लवकरच जमीनदोस्त

## 31 डिसेंबरअखेर एनजीटीसह कोर्टाला अहवाल द्यावा लागणार : महापालिका वसूल करणार 5 कोटी दंड

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली येथील इंद्रायणी नदीच्या निळ्या पूररेषेत राजकीय वरदहस्ताने बांधलेल्या बेकायदेशीर २९ बंगले आणि इतर बांधकामे केली होती. त्या डेव्हलपर्ससह संबंधित घरे बांधणा-या नागरिकांची महापालिका अतिक्रमण विभागाकडून सुनावणी पूर्ण करण्यात आली. त्या सुनावणी निकाल देऊन हे बंगले लवकरच जमीनदोस्त केले जाणार आहेत. त्याशिवाय ३१ डिसेंबरअखेर एनजीटीसह (राष्ट्रीय हरित लवाद) उच्च न्यायालयाला देखील कारवाईचा अहवाल सादर करावा लागणार आहे. त्यामुळे ऐन विधानसभा निवडणुकीच्या धामधुमीत हे बंगले पाडले जाणार असल्याची दाट शक्यता आहे.




चिखली येथील इंद्रायणी नदीच्या निळ्या पूररेषेत बेकायदेशीर २९ बेकायदा बंगले आणि इतर बांधकामे पाडण्याचे निर्देश राष्ट्रीय हरित लवादाने पुणे जिल्हाधिका-यांना दिले होते. या निर्णया विरोधात रहिवाशांनी सुप्रीम कोर्टात धाव घेतली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने अपील अर्ज फेटाळून लावला होता. तसेच एनजीटीने दिलेला निर्णय कायम ठेवला होता. त्यामुळे पुणे जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार महापालिकेने इंद्रायणी नदीपात्रातील अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करण्यासाठी कायदेशीर प्रक्रियेला सुरुवात केली आहे. चिखली येथील सर्व्हे नंबर ९० मध्ये बंगलो प्लॉट बांधकाम प्रकल्प कार्यान्वित केला होता. सदरील प्लॉटिंग हे मे. जरे वर्ल्ड आणि इतर यांनी सुरू केले होते. महापालिका हद्दीत इंद्रायणी नदीपात्रातील निळ्या पूररेषेच्या प्रतिबंधित क्षेत्रात बांधकाम करण्यात आली होती. नदीचे अस्तित्व धोक्यात आणून हा प्रकल्प साकारताना पर्यावरण संरक्षण आणि सुधारणा कायद्यांचे उल्लंघन केले होते. संबंधित डेव्हलपर्स यांनी पर्यावरण अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन केले आहे. पर्यावरण कायदा-१९८६ जल (पी आणि सीपी) कायदा-१९७४ आणि वायू (पी आणि सीपी) अधिनियम १९८१ च्या तरतुदींचे उल्लंघन करून आर्थिक फसवणूक केलेली आहे.

त्यामुळे पुण्यातील हरित लवादाकडून २९ बंगले व इतर बांधकामे पाडण्याचे आदेश दिले होते. हे क्षेत्र पुन्हा मूळ स्थितीत आणण्याचा आदेश पारित करण्यात आला. संबंधितांना पर्यावरण नुकसान भरपाईसाठी ५ कोटी रुपयांचा दंडदेखील ठोठावला आहे. या निर्णयाविरोधात संबंधित रहिवाशांनी सर्वोच्च न्यायालयात अर्ज केला. न्यायालयाने रहिवाशांचा अपील अर्ज फेटाळून लावत एनजीटी निर्णय कायम ठेवला होता. दरम्यान, पुणे जिल्हाधिका-यांच्या आदेशानुसार महापालिकेच्या अनधिकृत व अतिक्रमण विभागाकडून चिखली इंद्रायणी निळ्या पूररेषेतील २९ बंगले आणि इतर बांधकामे पाडण्यासाठी कायदेशीर नोटीस बजावून सुनावणी प्रक्रिया सुरू केली. महापालिकेत सोमवारी (दि. ७) रोजी संबंधित बंगले बांधणा-या घरमालक, जागामालक, डेव्हलपर्स यांच्या सुनावणी पूर्ण करण्यात आल्या. त्यांचे सर्वाचे लेखी म्हणणे महापालिकेकडून घेतले असून त्या सुनावणीचा निकाल दिला जाणार आहे. तसेच महापालिकेला हे २९ बंगले आणि इतर बांधकामे पाडून एनजीटीसह कोर्टाला अहवाल सादर करायचा आहे. ३१ डिसेंबरपर्यंत हा अहवाल द्यावा लागणार आहे. यामुळे ऐन निवडणुकीच्या धामधुमीत हे बंगले पाडणार की बंदोबस्ताचे कारण देत महापालिकेकडून निवडणुकीनंतर बंगले पाडले जाणार, हे आता पाहावे लागणार आहे.

### नदीचे क्षेत्र मूळ स्थितीत आणावे लागणार

» चिखली येथे इंद्रायणी निळ्या पूररेषेत मेसर्स जरे ग्रुप जरे वर्ल्ड आणि इतरानी सर्व्हे नंबर ९० मधील बेकायदा बांधकामे केली होती. त्या विरोधात एनजीटीत तक्रार दाखल केली होती. इंद्रायणी नदीच्या निळ्या पूररेषेत भूखंड विकले गेले. त्यावर बेकायदा बांधकामे झाली होती. हे बांधकाम भूखंड मालकांनी केले होते. या बाबत एनजीटीने घटनास्थळाला भेट देण्यासाठी एक संयुक्त समिती स्थापन केली होती. त्या समितीने इंद्रायणी नदीकाठ आणि बीएफएल दरम्यान येते. पूर प्रवण क्षेत्रामध्ये बांधकामावर निर्बंध आहेत. पुरामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी पूररेषांचे सीमांकन केले आहे. निषिद्ध झोन आणि प्रतिबंधात्मक झोनमध्ये परवानगी नसताना जमिनीवर बेकायदा बांधकामे केली होती. नदीत भराव टाकून आणि बांधकामे केलेली होती. त्यावर इंद्रायणी नदीच्या पूररेषा प्रतिबंधित क्षेत्रात बांधकाम हटविण्यात यावे. तेथील राडारोडा, गाळ त्वरित हटवावा. बिल्डर आणि प्लॉट विक्रेते यांनी केलेले क्षेत्र मूळ स्थितीत आणण्याचे निर्देश देखील दिले होते.

# गंगोत्री पार्क येथील रस्त्याच्या कामाला 'ग्रीन सिग्नल'

## महानगरपालिका स्थापत्य विभागाकडून काम सुरु : वाहनचालक, नागरिकांचा मन:स्ताप होणार कमी

**पिंपरी | प्रतिनिधी**

महानगरपालिका प्रभाग क्रमांक 5 मध्ये गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित गंगोत्री पार्क येथील रस्त्याच्या कामाला अखेर सुरूवात झाली. महानगरपालिका स्थापत्य विभागाकडून तात्काळ दुरूस्तीचे काम हाती घेतले आहे. भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या सूचनेनंतर या कामाला गती मिळाली असून, वाहनचालक व स्थानिक नागरिकांना दिलासा मिळाला आहे.



भोसरी-दिघी रस्ता गंगोत्री पार्क या सोसायटीच्या कॉर्नरपर्यंत सुमारे १८ मीटरचा आहे. सदर रस्ता पुढे बंद आहे. २००५ ते २०१० दरम्यान रस्त्याच्या बाजुला प्लॉटिंग करून विकले आणि काही ठिकाणी गृहप्रकल्प बांधून विकण्यात आला. सोसायटी उभारण्यात आल्या. त्यामुळे रस्ता 'बॉटलनेक' झाला आहे. भोसरीतून दिघीला जाणारा जवळचा रस्ता असल्यामुळे या रस्त्यावर मोठ्याप्रमाणात वाहतूक असते. मात्र, रस्त्याची दुरावस्था झाल्यामुळे नागरिकांत मोठी नाराजी होती.

दरम्यान, आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक सामाजिक कार्यकर्ते सागर गवळी आणि सौ. कविता भोंगाळे यांनी याकामी पुढाकार घेतला. महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांनी दोन-तीन दिवसांत काम सुरू करतो, असे आश्वासन दिले होते. त्यांनी दिलेला 'शब्द' पूर्ण केला आहे. स्थापत्य विभागाच्या माध्यमातून सदर रस्त्याचे काम सुरू झाले आहे.

### विरोधी उमेदवारांकडून नागरिकांची दिशाभूल..

» वास्तविक, प्रभाग ५ अंतर्गत येणाऱ्या गंगोत्री पार्क रस्त्याचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. या प्रभागात सुमारे २० वर्षे प्रतिनिधीत्व करणाऱ्या माजी नगरसेवकांनी रस्त्यांचा गुंता सोडवला नाही. आता सदर प्रश्न सुटणार आणि आम्ही सोडवला असा दावा करीत पाणी पुरवठा अधिकाऱ्यांचा पाहणी दौरा करण्यात आला. त्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आले. पण, सदर काम स्थापत्य विभागाकडून करण्यात येत आहे. निवडणुकीच्या तोंडावर राजकीय नेत्यांनी सोशल मीडियावर पब्लिसिटी करण्यापेक्षा आपल्या सत्ताकाळात आपण केले? काय करणार आहोत? याबाबत लोकांना माहिती द्यावी. नागरिकांना सुविधा मिळाव्यात. यासाठी लोकप्रतिनिधींनी काम केले पाहिजे. नागरी समस्यांबाबत राजकारण न करता समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे, अशी भावना स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# पुणेकरांना 44 कोटींचा ‘स्मार्ट’ हिसका

## अ‍ॅडॅप्टिव ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम (एटीएमएस) यंत्रणेचा खर्च भागविण्यासाठी निधी द्यावा : स्मार्ट सिटीची महापालिकेकडे मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

स्मार्ट सिटी प्रकल्पाचा फटका पुणे महापालिकेला बसला आहे. शहरातील रस्त्यांवरील वाहतूक नियंत्रित करण्यासाठी स्मार्ट सिटीने उभारलेल्या अ‍ॅडॅप्टिव ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम (एटीएमएस) यंत्रणेचा खर्च भागविण्यासाठी ४४ कोटी रूपयांचा निधी द्यावा, अशी मागणी स्मार्ट सिटीने महापालिकेकडे केली आहे. पुढील चार वर्षांसाठी ही रक्कम एकरकमी द्यावी. तसेच, कंपनीकडे पैसे नसल्याने पालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या ३४ गावांमध्ये एटीएमएस यंत्रणा उभारण्यासाठी १९२ कोटी रुपये द्यावेत, अशी मागणी पालिकेकडे करण्यात आली आहे.

केंद्र सरकारने शहरातील औंध, बाणेर, बालेवाडी भागांसह इतर ठिकाणी महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्याासाठी ‘स्मार्ट सिटी’ कंपनी सुरू केली होती. मात्र, याच कंपनीने राबविलेल्या प्रकल्पाचा भुर्दंड आता पालिकेला सहन करावा लागणार आहे. शहरातील वाहतुकीला शिस्त लागावी, तसेच प्रमुख रस्त्यांवरील कोणत्या चौकात वाहनांची अधिक गर्दी असते. त्या रस्त्यावरील वाहतूक नियंत्रण दिव्यांची वेळ परिस्थितीनुसार कमी अधिक करण्याची स्वंयचलित यंत्रणा स्मार्ट सिटीने राबविली.



विकासकामे आणि निधी

पहिल्या टप्प्यात शहरातील मुख्य रस्त्यांवरील प्रमुख १०० हून अधिक चौकांमध्ये ही यंत्रणा बसविण्यात आली. यासाठी सुमारे शंभर कोटी रुपये खर्च करण्यात आला.

या यंत्रणेच्या पाच वर्षांच्या देखभाल दुरुस्तीसाठी ५७ कोटी रुपये महापालिका देणार आहे. यापैकी पहिल्या हप्त्याचे १३ कोटी रुपये महापालिकेने दिले आहेत. उर्वरित ४४ कोटी रुपये पालिकेला द्यावे लागणार आहेत. ही रक्कम एकरकमी द्यावी, अशी मागणी स्मार्ट सिटीने पालिकेकडे केली आहे.

महापालिकेत समाविष्ट करण्यात आलेल्या नवीन ३४ गावांमधील १०० प्रमुख चौकांमध्ये ही यंत्रणा उभारण्याचा आराखडा सादर केला आहे. देखभाल दुरुस्तीसह १९२ कोटी रुपयांचा खर्च महापालिकेने करावा. यंत्रणा उभारणे आणि देखभाल दुरुस्ती स्मार्ट सिटी कंपनी करील, असेही स्मार्ट सिटीने पालिकेला पाठविलेल्या पत्रात नमूद केले आहे.

### कामे अपूर्ण

» स्मार्ट सिटीने बसविलेल्या एटीएमएस यंत्रणेतील कंट्रोल कमांड सेंटर आणि अन्य काही कामे अपूर्ण आहेत. कामासाठीचा कंपनीकडील निधी संपल्याने उर्वरित कामे पुर्ण करण्याचे आणि त्याची देखभाल दुरुस्ती करण्याचे आव्हान स्मार्ट सिटीपुढे आहे. या पार्श्वभूमीवर स्मार्ट सिटी कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी महापालिकेला देखभाल दुरूस्तीसाठी उर्वरीत ४४ कोटी रुपये एकरकमी देण्याची मागणी केली आहे.

### वाहतूक कोंडी कायम

» स्मार्ट सिटीने शहरातील वाहतूक गतिमान करण्यासाठी एटीएमएस यंत्रणा उभारण्याचा निर्णय घेतला. याच्या देखभाल दुरूस्तीचा खर्च महापालिकेकडून घ्यायचा असा प्रस्ताव ठेवला. त्याला महापालिकेतील तत्कालीन सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी मान्यताही दिली. या प्रकल्पांतर्गत शहरातील प्रमुख चौकातील जुनी सिग्नल यंत्रणा काढून त्याठिकाणी आधुनिक सेन्सर आणि कॅमेरे असलेले वाहतूक नियंत्रण दिवे उभारले गेले. इंटरनेटद्वारे हे सर्व कॅमेरे सेंट्रल कमांड सेंटरशी जोडण्यात आले. वाहने ठराविक गतीने मार्गक्रमण करू शकतील, अशी ही यंत्रणा असेल, असा दावा करण्यात आला. मात्र नवीन यंत्रणा बसविल्यानंतर या रस्त्यांवरील आणि चौकातील वाहतूक कोंडी अद्याप सुटलेली नाही.

# पुणेकरांना आणखी दीड वर्ष वाहतूक कोंडीचा त्रास

## साधू वासवानी पुलाचे काम पूर्ण होण्यासाठी होणार विलंब : महापालिका आयुक्तांची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे स्टेशन परिसरातील साधू वासवानी पुलाला ५० वर्षे पूर्ण झाली असून हा पूल वाहतुकीसाठी धोकादायक झाला होता. तो पूल पाडून नव्याने बांधला जाणार आहे. पूल पाडण्याचे काम संथ गतीने सुरू आहे. तो बंधून पूर्णहोण्यासाठी आणची दीड वर्षांचा कालावधी लागणार असल्याने तोपर्यंत या भागातून ये-जा करणाऱ्या पुणेकरांना वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागणार आहे.

हा पूल पाडून पुन्हा नव्याने पूल कधी बांधला जाणार, अन् वाहतूक कोंडीतून कधी सुटका होणार, असा प्रश्न पुणेकरांनी उपस्थित केला होता. त्यावर महापालिका आयुक्तांनी हा पूल पाडून नवीन पूल तयार होण्यासाठी दीड वर्षाचा कालावधी लागणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे या मार्गावरून जाणाऱ्या वाहनचालकांना आणखी दीड वर्षे वाहतूक कोंडीचा सामना करावा लागणार आहे.

साधू वासवानी पुलाचे कोरेगाव पार्क भागाकडील पूल पाडण्याचे काम पूर्ण झाले आहे. आता तेथे खोदाई करून नवीन पुलासाठी आवश्यक पाया करण्याच्या कामाला महापालिका प्रशासनाने सुरुवात केली आहे. तर दुसऱ्या बाजूकडील पूल पाडण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडून ब्लॉकच्या वेळापत्रकाला मंजुरी मिळणे आवश्यक असून, त्यासाठी महापालिकेकडून पाठपुरावा केला



जात आहे, असे महापालिकेच्या प्रकल्प विभागाने सांगितले आहे. परंतु हा पूल पाडण्याचे काम प्रत्यक्षात संथ गतीने सुरू आहे. पुण्यातील वाहतूक कोडींची समस्या पाहता या पुलाचे काम जलद गतीने होणे अपेक्षित आहे.

पुणे स्टेशन परिसरात असलेल्या साधू वासवानी पुलाच्या बांधकामाला ५० पेक्षा अधिक वर्षे झाली आहेत. हा पूल वाहतुकीसाठी धोकादायक ठरला होता. त्यामुळे हा पूल पाडून तेथे नवीन उड्डाणपूल उभारण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. हे काम सुरू करण्याची परवानगी मे २०२३ मध्ये देण्यात आली होती. मात्र वाहतूक पोलीस तसेच रेल्वे विभागाची मान्यता न मिळाल्याने हे काम सुरू होण्यास एक वर्ष विलंब झाला. पाच महिन्यांपूर्वी मे २०२४ मान्यता मिळाल्यानंतर रेल्वे प्रशासनाकडून कोरेगाव पार्कच्या बाजूने हा पूल पाडण्याच्या कामाला जून महिन्यात सुरुवात झाली.

दरम्यान, साधू वासवानी पुलाच्या पुणे कॅन्टोन्मेंटकडील दुसऱ्या बाजूचे पाडकाम करण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडून ब्लॉकचे वेळापत्रक मिळण्याची आवश्यकता आहे. महापालिकेने रेल्वेकडे त्यासाठी पाठपुरावा केला आहे. वाहतुकीच्या व्यस्त वेळापत्रकामुळे लोहमार्गावरील पूल पाडण्याचे सलग काम करणे तांत्रिकदृष्ट्या अडचणीचे आहे. त्यामुळे रेल्वे प्रशासनाकडून महापालिकेला टप्प्याटप्प्यानुसार दिल्या जाणाऱ्या वेळेनुसार (ब्लॉक) आणि रेल्वे प्रशासनाच्या देखरेखीखाली संबंधित काम करण्यात येणार आहे. मात्र, त्याला अद्याप परवानगी मिळण्यास वेळ लागत होता.

मंगलदास रोड आणि येरवडा आणि कोरेगाव पार्ककडे जाणाऱ्या हजारो वाहनचालकांना त्यामुळे कसरत करावी लागत आहे. तसेच पुणे स्टेशन, शिवाजीनगरकडे जाण्यासाठी मोठा वळसा घालावा लागत आहे. साधू वासवानी पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आल्यानंतर या परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. रोजच्या वाहतूक कोंडीला नागरिक त्रासले आहेत.